आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ जुलै २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे घानाच्या संसदेत संबोधन

बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्यांना भरपाई द्यायला वीमा कंपनी बांधिल नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध

**आणि**

अँडरसन तेंडुलकर करंडकातल्या दुसऱ्या सामन्यात शुभमन गिलच्या द्विशतकाच्या जोरावर भारतीय संघ मजबूत स्थितीत

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज घानाच्या संसदेला संबोधित केलं. घानामधली लोकशाही, गौरव आणि लवचिकता यांचा गौरव त्यांनी केला. यावेळी त्यांनी भारताच्या विविधतेचा सन्मानपूर्ण उल्लेख केला.

- **- होल्ड प्रधानमंत्री बाइट - -**

जागतिक पटलावर दक्षिणेकडच्या देशांचा आवाज बुलंद करण्यासाठी आवश्यक सुधारणांची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. एक पृथ्वी एक कुटुंब एक भवितव्य या भारताच्या जी२० मधील नाऱ्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. शाश्वत जीवनासाठी लाईफ या योजनेचा उल्लेख करत त्यांनी एक जग, एक सूर्य, एक ग्रीड तसंच एक जग, एक आरोग्य यावर भर दिला. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीत होणाऱ्या चर्चा अनुभवण्यासाठी भारताच्या संसदेत येण्याचे आमंत्रण त्यांनी घानाच्या खासदारांना दिले. सबका साथ सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास यांची आवश्यकताही त्यांनी अधोरेखित केली.

प्रधानमंत्र्यांना Companion of the Order of the Star of Ghana या घानाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं आज सन्मानित करण्यात आलं. घानाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज त्रिनिदाद आणि टोबॅगोला रवाना झाले.

**<><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण सामग्री खरेदी समितीनं आज स्वदेशी बनावटीची १ लाख कोटींहून अधिक रकमेच्या संरक्षण सामग्री खरेदी प्रस्तावांना मंजूरी दिली. यामध्ये चिलखती वाहनं, इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली, पृथ्वीवरुन हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रं आदींचा समावेश आहे.

<><><><>

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी संविधानिक प्रक्रिया राबवून त्याचप्रमाणे नियमित बैठका घेऊन समाजातल्या तळागाळापर्यंत लोकशाही मजबूत केली पाहिजे, असं आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. हरियाणातल्या मनेसार इथं राष्ट्रीय स्तरावरील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखांच्या पहिल्या परिषदेचं उद्घघाटन केलं. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><>

सर्व पात्र मतदात्यांचा समावेश मतदार यादीत करण्यासाठी बिहारमध्ये विशेष मतदारयादी पुनरिक्षण सुरु असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली आहे. नवी दिल्लीत निर्वाचन सदन इथं मुख्य निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार यांच्यासह सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यां आयुक्तांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या सूचना ऐकून घेतल्या तसंच त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं दिली. बिहारमध्ये मतदार यादी पुनरिक्षणाचं काम सुरळीत सुरु असून महत्वाच्या राजकीय पक्षांनी नेमलेले एक लाख ५४ हजार बुथ स्तरावरचे कार्यकर्ते ही प्रक्रिया पारदर्शक असावी यावर लक्ष ठेवून आहेत, असंही निवडणूक आयुक्तांनी या वेळी सांगीतलं.

<><><><>

बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्यांसाठी विमा कंपनी भरपाई द्यायला बांधील नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्या कुटुंबाने गाडीचा टायर फुटून अपघात झाल्याचा दावा केला होता आणि विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. मात्र, पोलिसांच्या आरोपपत्रात कुटुंबाच्या प्रमुखानेच बेफिकीरपणे गाडी चालवल्यानं हा अपघात झाल्याचं म्हटलं होतं.

<><><><>

कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत. बिगर व्यावसायिक कर्ज घेणाऱ्यांकडून अशा प्रकारचं शुल्क कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्थेनं घेऊ नये असं रिझर्व्ह बँकेने म्हटलं आहे. येत्या आर्थिक वर्षापासून यासंदर्भातले दिशा निर्देश लागू होणार आहेत. सरकारी आणि खासगी बँका, सहकारी बँका, गैर बँकिंग वित्तीय संस्था यांना हे दिशानिर्देश लागू होतील. कर्जाचा पूर्ण किंवा अंशतः भरणा केला तरी तसंच कुठल्याही किमान कालावधीच्या अटीशिवाय हे दिशा निर्देश लागू होतील. ज्या कर्जांना हे दिशा निर्देश लागू होणार नाही, त्या कर्जाच्या मंजुरी पत्रात याचा स्पष्ट उल्लेख करण्याचे आणि शुल्काची रक्कम लिहिण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेनं दिले आहेत.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर येत आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचा अश्वारूढ पुतळा खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शहा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील छात्र आणि सैन्याधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

<><><><>

टीआरपी अर्थात टेलिव्हिजन रेंटींगसाठी लवकरच स्मार्ट टीव्ही, मोबाइल ॲप आणि अन्य माध्यमातून ऑनलाइन टीव्ही पाहणाऱ्यांचीही मोजणी केली जाणार आहे. सध्या केवळ केबल आणि डीटीएच माध्यमातून टीव्ही पाहणाऱ्यांची मोजणी होते. देशात सध्या २३ कोटींहून अधिक घरात टीव्ही आहेत मात्र टीआरपीसाठी ५८ हजार टीव्ही पाहणाऱ्यांचे सर्वेक्षण होते. या संदर्भातले नवे दिशानिर्देश माहिती प्रसारण मंत्रालयाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि एका महिन्यात सर्वसामान्यांना त्यावर सूचना नोंदवता येतील. या क्षेत्रात अधिकाधिक संस्थांसाठी दरवाजे खुले करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. टीव्ही क्षेत्रात कुठलेही हितसंबंध नसलेल्या अधिकाधिक कंपन्यांना यात प्रवेश करता येईल. सध्या Broadcast Audience Research Council ही एकमेव संस्था या क्षेत्रात कार्यरत आहे.

<><><><>

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे सध्या अंतराळातल्या प्रयोगशाळेत मेंदू आणि संगणकात थेट संवाद घडवून आणणारी प्रणाली विकसित करण्याचा प्रयोग करत असल्याची माहिती अमेरिकेची अंतराळ संस्था नासानं दिली आहे. थॉट्स ओव्हर ग्रॅविटी या संकल्पनेअंतर्गत हा प्रयोग सुरू असल्याचं नासानं म्हटलं आहे. या प्रयोगावर शुक्ला यांच्यासोबत पोलंडचे त्यांचे सहकारी अंतराळवीर स्लाव्होश हे सुद्धा काम करत आहे.

शुक्ला यांनी सूक्ष्मजलचर प्राणी सूक्ष्म गुरुत्वाकर्षणासारख्या आव्हानात्मक परिस्थितीत कसा टिकाव धरतात, तसंच वजनरहीत स्थितीतली स्नायू दुरुस्ती प्रक्रिया समजून घेण्यासंबंधीच्या प्रयोगांवरही काम केलं आहे.

**<><><><>**

अमेरिकेनं अतिरिक्त आयात शुल्काच्या अंमलबजावणीला दिलेल्या स्थगितीची मुदत संपत आल्याच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये दोन्ही देशांमधल्या प्रस्तावित तात्पुरत्या व्यापार कराराला अंतिम स्वरुप देण्याच्या चर्चेला वेग आला आहे.

रोजगार निर्मितीत मोठं योगदान देणाऱ्या कपडे, पादत्राणे आणि चामड्याच्या वस्तूंसारख्या श्रम-केंद्रित वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळावी असा भारताचा प्रयत्न आहे, तर आपल्या कृषी आणि दैनंदिन उत्पादनांसाठी शुल्क सवलत मिळावी असा अमेरिकेचा प्रयत्न सुरू आहे. यादृष्टीनं विशेष सचिव राजेश अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेच्या भेटीवर असलेल्या भारताच्या वाटाघाटी पथकानं आपला मुक्काम वाढवला आहे. महत्त्वाचे मतभेद दूर करत, २०३० पर्यंत दोन्ही देशांमधला द्विपक्षीय व्यापार दुपटीनं वाढवून ५०० अब्ज डॉलरपर्यंत पोहण्याचा प्रयत्न असल्याचं भारताच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

अँडरसन तेंडुलकर करंडकातल्या दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात भारतीय संघ ७ गडी गमावून ५६४ धावांवर खेळतो आहे.  कर्णधार शुभमन गिलनं २९ चौकार आणि ३ षटकारांच्या बळावर केलेल्या द्विशतकानं यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या सामन्यात शुभमन गिल यानं सुनिल गावस्कर यांचा इंग्लंडमध्ये भारतीय फलंदाजानं केलेल्या सर्वाधिक २२१ धावांचा विक्रम मागे टाकला. ८९ धावा करुन बाद झालेल्या रविंद्र जडेजाच्या आणि यशस्वी जयस्वाल यांच्या व्यतिरीक्त एकाही भारतीय फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. ***//<><><><>//***